# अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र. ६

(चिखले (भाग),मोहो(भाग)शिवकर(भाग) व पालीखुर्द(भाग)

नैना कार्यालय, टॉवर नं. १०,सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर- नवी मुंबई – ४००६१४

---

## जाहीर सूचना

(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्रमांक १३(९) अन्वये)

लवाद/न.र.यो-६/अंतिम परियोजना निवाडा/२०२५/ दि. १०/०७/२०२५

शासनाच्या नगर विकास विभागाने निम्न स्वाक्षरीकार यांची अधिसूचना क्र. टीपीएस-१२२२/२१५२/प्र. क्र.१४८/२२/नवि-१२, दिनांक २ डिसेंबर २०२२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२(१) अन्वये लवाद म्हणून मंजूर प्रारुप नैना नगर रचना परियोजना क्र. ६ साठी नियुक्ती केलेली आहे.

त्याप्रमाणे निम्नस्वाक्षरीकार यांनी अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र. ६ चा निवाडा उक्त् अधिनियमांच्या कलम ७२(७) अन्वये तसेच उक्त् नियमांच्या नियम क्र. १३(९) प्रमाणे दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी विहीत मुदतीत जाहीर केलेला आहे.

याबाबतची सूचना दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-२ व दिनांक ०१.१०.२०२४ रोजीचे वृत्तपत्र दैनिक किल्ले रायगड मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. तसचे योजनेचा अहवाल, फॉर्म, क्र. १ व २, व योजनेचे नकाशे हे सिडकोच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम नगर रचना परियोजना प्रामुख्याने भूखडांचे मूल्य, अंशदान, खर्चाचा अंदाज इत्यादी स्वरुपाची आहे. त्यानुसार प्रत्येक जमीन मालकाला विहीत नमुना क्रमांक ५ मध्ये त्याच्या अंतिम भूखंडाचे मूल्य तसेच अंशदान इत्यादींचा तपशील उक्त् नियमांच्या नियम क्र.१३(९) प्रमाणे पोस्टामार्फत पाठविण्यातआलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम च्या कलम ७३ अन्वये कलम ७२, पोट कलम ६ चे खंड १,२,४, ५ आणि खंड ७ ते १३ या मधून उदभवणा-या बाबींखेरीज इतर बाबतीत लवादांचा प्रत्येक निर्णय हा अंतिम व निर्णायक राहील आणि नियोजन प्राधिकरणासह सर्व पक्षांना तो बंधनकारक राहील अशी तरतुद आहे. तसेच कलम ७४ अन्वये कलम ७२ चे पोट कलम ६ खंड चे १,२,४, ५ आणि खंड ७ ते १३ अन्वये लवादाने दिलेले कोणतेही निर्णय नियोजन प्राधिकरणासह संबधीत पक्षांना कळविण्यात येतील आणि अश्या निर्णयामुळे स्वत:वर अन्याय झाला आहे असे वाटणा-या कोणत्याही पक्षास अपिल न्यायाधिकरणाकडे ही बाब अपीलावरील निर्णयाकरीता पाठविण्यासाठी लवादाकडे अर्ज करता येईल अशी तरतूद आहे.

**असे आढळून आले आहे की, काही अंतिम भूखंडांच्या जमीन मालकांना अद्याप अशा नोटीसा मिळालेल्या नाहीत, या संदर्भात निम्न स्वाक्षरीकार ही जाहीर नोटीस देत आहेत की,अंतिम भूखंडांच्या ज्या जमीन मालकांना अशा नमुना क्र.५ मधील नोटीसा मिळालेल्या नाहीत त्या त्यांनी लवादांच्या कार्यालयात तात्काळ येवून घेवून जाव्यात.**

**जमीन मालकांना असे ही कळविण्यात येत आहेकी, वर नमूद अधिनियमाचे तरतुदीनुसार जर अंतिम भूखंडाचे जमिन मूल्य,अंशदान बाबत त्यांना अपील करावयाचे असेल तर ही जाहीर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्यांच्या कालावधीत निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी दाखल करावे.**

(अभिराज गिरकर)
लवाद,

नगर रचना परियोजना क्र.६ (नैना)

दिनांक- जुलै २०२५

पत्ता- नैना कार्यालय , टॉवर नं. १०,
आठवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन,
सिबीडी- बेलापूर- नवी मुंबई-४०० ६१४